# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

***फोन नं.(०२०) २६०५०६४१*** **ई-मेल आयडी** :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/अभि२८-१४/स.नि.नि.अ.निकष/परिपत्रक/४२४८ /सन २०१७
दिनांक :- २९/०७/ २०१७

**विषय :- सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्ती निकषाबाबत..**

संदर्भ :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १२

२. प्राधिकरणाचे परिपत्रक जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-५/स.नि.नि.अ./प.नि./६५७९/१६, दि.८.११.१६

३. प्राधिकरणाचे जा.क्र.रासनिप्रा/नि.वा.ख.मर्या./मार्ग.सुचना/६७७५/२०१६, दि.१६.११.१६

## -: परिपत्रक :-

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १२ अन्वये सहकारी संस्थेच्या समितीची निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी आणि त्याला मदत करण्यासाठी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्तीचे अधिकार प्राधिकरणास आहेत. त्याअनुषंगाने जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडून निवडणूक निर्णय अधिकारी अणि त्याला मदत करण्यासाठी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीचे प्रस्ताव प्राधिकरणास सादर केले जातात. सदरचे प्रस्ताव निवडणूक कार्यक्रम सुरु झालेनंतर किंवा निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्ती केलेनंतर प्राधिकरणास प्राप्त होतात. सदर प्रस्तावाची छाननी केली असता, प्राधिकरणाच्या असे निदर्शनास आले आहे की, निवडणूक निर्णय अधिका-यास मदत करण्यासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीचे प्रस्ताव सादर करताना नियुक्तीची आवश्यकता/कारणमिमांसा उदा. कार्यक्षेत्र, मतदान केंद्र संख्या, सभासद संख्या, संवेदनशीलता, पूर्वइतिहास, वादगस्त व न्याप्रविष्ठ पार्श्वभूमी इ. नमूद केली जात नाही, केवळ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीबाबत मोघम प्रस्ताव प्राधिकरणास सादर केले जातात. प्रस्तावात संयुक्तिक कारणमिमांसा नमूद नसणे तथा मोघम प्रस्ताव सादर केले कारणास्तव असे प्रस्ताव प्राधिकरणाकडून नामंजूर केले जातात.

सदरच्या बाबी टाळण्याकरीता तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीची आवश्यकता इ. करीता प्राधिकरण पुढीलप्रमाणे निकष निश्चित करीत आहे.

१) *क* व *ड* वर्गातील संस्थांच्या निवडणूकीसाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करु नयेत. मात्र *क* वर्गातील ३,००० सभासद व जिल्हा किंवा त्यापेक्षा जास्त कार्यक्षेत्र असणा-या संस्थेवर आवश्यकता असल्यास सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करता येईल.

२) *ब* वर्गातील गावपातळीवरील कोणत्याही संस्थेस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करता येणार नाही.

३) *ब* वर्गातील ज्या संस्थेचे कार्यक्षेत्र जिल्हा व त्याहून जास्त असेल अशा संस्थेवर आवश्यकता असल्यास सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नेमता येईल.

४) *ब* वर्गातील गाव पातळीवरील एखादया संवदेनशील संस्थेवर जि स नि अ / ता स नि अ हे निवडणूक निर्णय अधिकारी असतील अशा ठिकाणी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नेमता येईल.

५) *ब* वर्गातील ज्या संस्थांचे कार्यक्षेत्र हे जिल्हा व सभासद संख्या ५,००० ते १०,००० किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा ठिकाणी एक सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करता येईल.

६) *ब* वर्गातील ज्या संस्थांचे कार्यक्षेत्र हे जिल्हा व सभासद संख्या १०,००० ते २०,००० किंवा त्यापेक्षा जास्त सभासद असेल त्या ठिकाणी दोन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तर २०,००० पेक्षा जास्त सभासद असतील त्या ठिकाणी ३ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करता येईल.

७) विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या निवडणूकीस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नेमता येणार नाही. अपदावात्मक स्थितीत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती केली तरी त्यांना दिनांक १६.११.१६ परिपत्रकानुसार मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

वरील सर्व बाबींची खात्री करुनच जि स नि अ / ता स नि अ यांनी निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीच्या प्रस्तावातच त्यांना मदतीसाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीची शिफारस करावी.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने**

२८/७/१७

**(यशवंत गिरी)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**प्रति,**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)